Special Issue, February- 2019

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Refereed Research Journal

# VIDYAWARTA®



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि
जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव-ने संचलित

## लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय

दहिगाव-ने, ता.शेवगाव, जि.अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# राज्यस्तरीय मराठी चर्चासत्र

## आधुनिक मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रकार

* अतिथी संपादक *

प्रा.डॉ.निलेश खरात
प्रा.अमोल गुंड

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित

## लोकनेते मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय

दहिगाव ने ता.नेवासा, जि. अहमदनगर

आणि

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# आधुनिक मराठी साहित्य:स्वरूप आणि प्रकार

अतिथी संपादक

प्रा. डॉ. निलेश खरात

प्रा.अमोल गुंड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

# Index

01) आधुनिक मराठी कथा वाङ्मयाचा अभ्यास
पाटील पद्मावती प्रभाकर, सोलापूर ||08

02) आधुनिक कथालेखिका आणि त्यांच्या कथेतील समाजचित्रण
प्रा. डॉ. जितेंद्र शरणप्पा बिराजदार, जिल्हा सोलापूर ||10

03) आदिवासी मराठी आत्मचरित्रे
प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित, अहमदनगर ||13

04) आधुनिक कथा वाङमयाचे स्वरुप आणि मूल्ये
प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, जि. बीड ||20

05) आधुनिक स्त्रीवादी कविता
प्रा. डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ, ता.नेवासा ||23

06) आधुनिक मराठी साहित्य व ललित गद्याचा प्रवास
बिजेवाले उध्दव राधाकृष्ण, औरंगाबाद ||24

07) दलित साहित्य संकल्पना, स्वरुप वैशिष्ट्ये
प्रा.दत्तात्रय सदाशिव सावंत, जि.पुणे ||26

08) फेसाटी : आधुनिक मराठी साहित्य प्रकारांच्या बदलत्या संदर्भमूल्यांचा अंत:स्वर
डॉ. बाळासाहेब दास, टेंभूर्णी ||29

09) मराठी प्रवासवर्णनातील स्त्रियांचे योगदान
डॉ. किसन रंगनाथ पिसाळ ||33

10) आत्मचरित्र : एक साहित्यप्रकार
प्रा. हनुमंत बाजीराव मते, सोलापूर ||36

11) आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे स्वरूप
प्रा. रामदास पंढरीनाथ कातकडे, जि.अहमदनगर ||39

12) साहित्य प्रकार : कथा
प्रा. डॉ. संजय दरवडे, भेंडे ||43

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

13) लोककथा आणि आधुनिक कथा
प्रा.डॉ.चंद्रकांत प्रभाकर काळे, जि.अ.नगर ||49

14) लोकप्रिय साहित्य : संकल्पना व स्वरुप
प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग–सोनी, शिक्रापुर ||51

15) ग्रामीण कविता व बदलत्या ग्रामजीवनाचे वास्तवदर्शन
प्रा. डॉ. द.के. गंधारे, जि. अ.नगर ||53

16) नाटक : स्वरुप व संकल्पना
नेटके राजेश अविनाश ||57

17) आधुनिक मराठी वैचारिक निबंधलेखनाचे स्वरुप व वेगळेपण
डॉ. अशोक डोळस, जि. अहमदनगर ||60

18) आधुनिक मराठी साहित्य प्रकार : लघुकादंबरी
डॉ. महादेव वाळुंज, ता. इंदापूर, जि. पुणे ||63

19) मराठी नवकथा : स्वरुप आणि वाटचाल
डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे, जि. नंदुरबार ||69

20) आधुनिक मराठी साहित्यातील वैद्यकीय व्यावसायिकांचे आत्मपर लेखन
प्रा. अमोल गुंड, जि. अहमदनगर ||75

21) मराठी कादंबरी स्वरुप व रचनाबंध
डॉ. अनिता सदाशिव आढाव, जि. अहमदनगर ||77

22) साहित्य व समकालीन संदर्भ
प्रा. डॉ. मधुकर बेकरे, जि. औरंगाबाद ||80

23) आधुनिक मराठी साहित्यप्रकार– कथा
प्रा. डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे, जि. अहमदनगर ||84

24) पारधीसमाजजीवन चित्रित करणारीआत्मकथने
प्रा.गवळी राजेंद्र अशोक, जि-अहमदनगर ||88

25) आधुनिक मराठी साहित्य : कादंबरी
प्रा.सुरेश लक्ष्मण नजन, शेवगाव ||90

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

26) आधुनिक मराठी साहित्यातील प्रवाह : महानगरीय कांदबरी
प्रा. डॉ. प्रवीण ताटे–देशमुख, जि. पुणे ||94

27) आधुनिक मराठी साहित्य आणि ललित गद्याचे स्वरूप
प्रा.डॉ. निलेश खरात ||102

28) मराठी नाटय रंगभूमीची प्रायोगिक मूल्ये आणि स्वरुप
प्रा. डॉ. चौधरी एन. डी., जि. बीड ||104

29) धग – एक आकलन
नानासाहेब महादेव गव्हाणे, पुणे ||105

30) साठोत्तरी मराठी कथेतील ग्रामीण जीवन
प्रा. डॉ. अनिल मुंढे, जि. लातूर ||108

31) आधुनिक कालखंडातील सौ. आनंदीबाई शिर्के यांच्या कथांचे स्वरूप व प्रकार
प्रा. सुषमा रामचंद्र जाधव & डॉ. महादेव वाळुंज, पुणे ||110

32) स्त्रीमनात आत्मविश्वास पेरणारी कविता : घआभाळ अंतरीचेङ
प्रा. डॉ. मारोती द. कसाब, जि. लातूर ||114

33) १९६० नंतरची मराठी कादंबरी
डॉ. दादा मरकड, जि. अहमदनगर ||117

34) आधुनिक मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रकार आदिवासी आत्मकथने : स्वरूप
प्रा. रामकिसन यादव नीळ, मुंगी ||123

35) प्रचलित मराठी साहित्यप्रकार : एक अवलोकन
प्रा.डॉ. मालुंजकर मच्छिंद्र केरुजी, अहमदनगर ||128

36) डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे यांच्या कथेचे स्वरुप
साबळे संतराम मधुकर,अहमदनगर ||134

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

लेखकांनी या आत्मकथनात मांडलेला दिसतो.

ही आत्मकथने फक्त भोगवटा, दुःख, वेदना सांगून थांबत नाहीततर अधिकार व सामाजिक न्यायासाठी लढायला शिकविते म्हणूनही आत्मकथने रडगाणेठरत नसून व्यवस्थेने वर्षानुवर्ष दाबलेल्या व नाकारलेल्या बहुसंख्य शोषीतांचे व उपेक्षितांचे जीवनगाणे ठरते. जीवन जगावं कसं? रडत-रडत, कुढतं-कुढतंकी लढत लढत. असे जीवन जगण्याचे तत्वज्ञान मांडणारीही आत्मकथने पुरोगामी व परीवर्तनवादी विचाराला प्रेरकठरणारे आहे.

आंदकोळ, चोरटा, पारध्याचं जीणं आणि उदई या आत्मकथनांसह भास्कर भोसले यांची दैनाही कादंबरी, गिरीश प्रभूणे यांचे पारधी हे ललितगदय, डॉ. बाळासाहेब बळे यांचे पारधी समाज लोकजीवन आणि लोकसंस्कृतीतसेच भाऊसाहेब राठोड यांचे पारधी लोकसंस्कृती अशा प्रकारे पारधी जीवनावर कलाकृतीकमी प्रमाणात आहेत.प्रस्तुत आत्मकथनांतील लेखनया सर्व संदर्भासह एकूण परिवर्तनाचे स्वरूप आणि भविष्यातील परिणाम या सगळ्यांना गवसणी घालणारे आहे. असेत्यांचे दर्शन चिकित्सक बुद्धीने प्रस्तुत प्रबंधिकेत घडेल. तसेच सर्व आदिवासी, भटक्या, विमुक्त जमातींमध्ये पारधीही जमात तुलनेने अद्याप अत्याधिक स्वरुपात अलिप्त, तेवढीच आक्रमण आणि तेवढी अविश्वासू आहे. या जमातीच्या आत्मकथनांचा अभ्यास केल्यास या जमातीच्या अस्तित्वारुपाची उकलतसेच जमातीच्या समस्या सुटण्यास मदत होवू शकेल.

**संदर्भग्रंथ :-**

१. सामाजिकसंशोधन पध्दती - डॉ. पु. ल. भांडारकर साईनाथ प्रकाशन २००३

२. पारधी - गिरिश प्रभूणे, राजहंस प्रकाशन

३. पारधी समाज - लोकजीवन व लोकसंस्कृती - डॉ. बाळासाहेब बळे, पद्मगंधा प्रकाशन

४. पारधी लोकासंस्कृती -भाऊसाहेब राठोड, गोदा प्रकाशन

५. महाराष्ट्रातील आदिवासी साहीत्य- एक शोध - डॉ. माहेश्वरी गावित

६. आदिम जीवनाविष्कार - डॉ. माहेश्वरी गावित

७. आदिवासी साहित्य - स्वरुप व समिक्षा - डॉ विनायक तुकाराम

८. आदिवासी साहित्य विचार - डॉ. माहेश्वरी गावित

९. आदिवासी लोकपरंपरा - डॉ. माहेश्वरी गावित

१०. आदिवासी साहित्य - चिंतन व चिकित्सा - डॉ. तुकाराम रोंगटे

११. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - चंद्रकुमार नलगे, रिया पब्लीकेशन कोल्हापूर

**25**

# आधुनिक मराठी साहित्य : कादंबरी

प्रा.सुरेश लक्ष्मण नजन
मराठी विभाग,
पी.एम.टी.चे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शेवगाव

**आधुनिक मराठी साहित्याचे स्वरूप :**

१८१८ या कालखंडाच्या मुळाशी पेशवाईची व पर्यायाने मराठी राजवटीची अखेर आणि ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ ही राजकीय घटना होती. या कालखंडाचा प्रारंभ इ. सनाच्या अठराव्या शतकाच्या अखेरीने एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीने धरण्यात आला आहे. नवीन वाङ्मयनिर्मितीस ज्यामुळे चालना मिळाली ती गोष्ट म्हणजे मुद्रणाची जोड होय. मराठी भाषेतील पुस्तकांचा पहिला मुद्रणसंस्कार इ.स. १८०५ मध्ये कलकत्याजवळ सेरामपूर येथे झाला. त्याच वर्षी तेथील ख्रिस्ती मिशनच्या मदतीने 'सेंट मॅथ्यू आणि मराठी भाषेचे व्याकरण' ही दोन पुस्तके मुद्रित होऊन प्रसिध्द झाली. याआधी एक वर्ष म्हणजे १८०४ मध्ये कलकत्याच्या 'कॉलेज ऑफ फोर्ट विल्यम' मध्ये मराठीच्या अध्ययन अध्यापनालाही प्रारंभ झाला होता. म्हणजेच इ.स. १८०० च्या जवळपासच आधुनिक मराठी वाङ्मयाच्या जोपासनेला प्रारंभ झाला. पुढील वाङ्मयनिर्मितीला स्फूर्ती, चालना, 'उत्तेजन वा वळण देण्यास फार मोठया प्रमाणात कारणीभूत झालेली चिपळूणकरांची, 'निबंधमाला' ही १८७४ साली सुरू झाली. ही मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने एक क्रांतीकारक घटनाच दिसते. पंडिती, शाहिरी काव्य, व बखरगद्य यांची निर्मिती याच काळात झालेली आपल्याला दिसुन येते.

आधुनिक मराठी साहित्याचा हा काळ नव्या



Scanned with CamScanner

वाङ्मयाच्या पूर्व तयारीचे युग होते, असे वाटते. आपले राज्य स्थिरप्रद व्हावे, त्याकरिता जित लोकांचे साहाय्य आपणांस मिळावे या स्वार्थी हेतूने का होईना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मराठीमध्ये ग्रंथनिर्मिती करवून घेण्याचे प्रयत्न केले, तसेच गद्य वाङ्मय व काव्य निर्मितीलाही 'दक्षिणा प्राइज कमिटी' कडून उत्तेजन मिळत गेलेले दिसते. नियत कालिकांचा उदय हा या कालखंडाचा नवा विशेष आहे. वर्तमान परिस्थिती ही नियतकालिकांचा माध्यमातून आपल्यासमोर येऊ लागली. ज्ञानप्रसार, मतप्रकटन, विचारजागृती, ज्ञानसंपादन हे हेतु मनात ठेवून नियतकालिकांच्या माध्यमातून कार्य चालू होते. किर्लोस्करांची नाटके, हरीभाऊ आपटे यांचे कादंबरी वाङ्मय, केशवसुतांची नवीन कविता यासारखे लेखक आपले साहित्य प्रकाशित करु लागले. हे वाङ्मय निर्माण होण्यास काही काळाची पार्श्वभूमी असलेली आपल्याला दिसते.

मराठी वाङ्मयाच्या नव्या वाङ्मयनिर्मितीस ज्यामुळे चालना मिळाली अशी सर्वाधिक महत्वाची गोष्ट म्हणजे मुद्रणाची जोड होय. दादोबा पांडुरंगाचे मराठी व्याकरण, मराठी भाषेचा शब्दकोश, वृत्तपत्र, मासिक, नियतकालिके यांचीही या काळात निर्मिती झाली. सुभाषिते, नितिकथा, पशुपक्ष्यांच्या कथा लिहून घेण्याच्या भूमिकेतूनच पंचतंत्र, बाळमित्र, हितोपदेश, पंचोपाख्यान, विदुरनीती, वेताळपंचविशी, सिंहासन बत्तिशी इ. ग्रंथ निर्माण झालेले दिसतात. 'ज्ञान हाच पराक्रम' असे उध्दार लोकहितवादीच्या शतपत्रात आढळतात. (शतपत्रे क्रमांक ८५)१८२९ पासुन सती पध्दत बंदी कायदा लागू करण्यात आला. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठांची स्थापना झाली. लॉर्ड मेकॉले सारखा ब्रिटिश अधिकारी इंग्रजी माध्यमांचा पुरस्कर्ता होता तर त्यांचाच अधिकारी जनरल बेटिंक शिक्षणाला अनुकूल गव्हर्नर होता. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी इंग्रजी विद्येला 'वाघिणीच्या दुधांची उपमा' दिलेली दिसते.

या सर्व घडामोडीनंतर कथा – कादंबरी लेखनाला सुरुवात झालेली दिसते. अर्वाचीन मराठीतील कथा रचनेचा प्रारंभ तंजावर येथील सर्फोजी राजे यांनी सक्खन पंडिताकरवी इ.स. १८०६ साली केलेल्या 'बालबोध मुक्तावली' या इसापनीतीच्या भाषांतराने झाला तर कादंबरी लेखनाची सुरुवात ऐतिहासिक, अद्भुतरम्य, सामाजिक या तीन प्रकाराने झालेली दिसते.

**कादंबरी**

रा. ब. मोरोबा कान्होबा विजयकर (१८१३ – १८७१)यांनी लिहिलेला 'घाशीराम कोतवाल' (१८६३) या कादंबरीचा पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. अरबी ग्रंथ विकणारांशी घाशीरामाने केलेली दगलबाजी व त्यासाठी त्याने इंग्रज अधिकाऱ्यांकडून न्याय मिळविण्यासाठी केलेली युक्ती यांचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. याच काळात रा. भि. गुंजीकर (१८४३–१९०१) यांची 'मोचनगड' (१८७१) नावाची कादंबरी प्रकाशित झाली. मोचनगडाचा नायक गणपतराव हा आपल्या जोडीदारासह दोन वर्षे तुरुंगात पडला होता. गणपतराव पती–पत्नी भिंत फोडून बाहेर पडले आणि महाराजांच्या किल्ल्याच्या आश्रयाला आल्यावर त्यांचा जीवनक्रम सुखी झाला, मुळात ही कादंबरी नावापुरतीच काल्पनिक वाटते. गुंजीकरांच्या नंतर उल्लेखिता येईल, अशी आणखी एक ऐतिहासिक कादंबरी म्हणजे विष्णू जनार्धन पटवर्धनकृत 'हंबीरराव व पुतलीबाई' (१८७३)ही होय. ही कादंबरी १८५७ च्या उठावानंतर केवळ अठरा वर्षानी लिहिली गेली.

व्दा.ना. रणदिवे यांनी लिहिलेल्या 'शिक्षक' (१८८३)या कादंबरीत लॉर्ड डलहौसीच्या संस्थाने खालसा करण्यासाठी दत्तक नामंजूर करण्याच्या धोरणाचा भाग पार्श्वभूमी म्हणून आला आहे. नाटय कथार्णवाचे कर्ते शंकर मोरो रानडे यांनी लिहिलेली शिलादित्य (१८७९–१८८४)ही कादंबरीही वातावरणाच्या दृष्टीने ऐतिहासिक म्हणावी लागेल. या कादंबरीत कथानक आठव्या शतकातील आंध्रप्रदेशातील हिंदू राजाच्या कारकीर्दीतील छळाला कंटाळून बंड करायला निघालेल्या जैन, बौध्द लोकांची हकीकत यात दिली आहे.

अव्वल इंग्रजींतील कथा–कादंबरी–वाङ्मयातील प्रधान प्रवृत्तीचे दर्शन घडविणारी प्रातिनिधीक कादंबरी म्हणून 'मुक्तामालेचा' उल्लेख केला पाहिजे. मुक्तामालेचे कर्ते लक्ष्मण मोरेश्वर हळबे,



Scanned with CamScanner

लेखक मूळचे वाईचे, संस्कृत, शास्त्रांच्या परंपरेतील होते. मुक्तमाला (१८६१)तर रत्नप्रभा (१८६६)साली प्रकाशित झाली. मुक्तामाला 'कादंबरी घटनाप्रधान असली, तरी तो तिचा खास विशेष नव्हे, मुक्तामालेतील बहुसंख्य घटना या योगायोगावर किंवा अपघातांवर आधारलेल्या आहेत. हळबे संस्कृत शास्त्राच्या परंपरेतील असल्यामुळे संस्कृत पध्दतीची रचनाशैली हे मुक्तामालेच्या अद्‌भूताचे एक महत्वाचे अंग दिसते. 'मुक्तामाला' या नायिकेच्या चित्रणात तिच्यावरील संकटातून निर्माण होणारा, एक स्त्रीविषयक खास जिव्हाळा असल्याचा दिसतो. मुक्तामालेची प्रतिकृती म्हणून ओळखली जाणारी लोकप्रियतेत तिची बरोबरी करणारी 'मंजुघोषा' आणि इतर दोन कादंबऱ्या या सोलापूर येथील हेडकारकून नारो सदाशिव रिसबूड यांनी लिहिल्या. मंजुघोषेच्या बाबतीत आपल्या व्दितीय पत्नीच्यामुळेच केलेल्या अन्यायाबाबत तिच्या बापाला पश्चात्ताप होतो. असे चित्रण या कादंबरीत लेखकाने रेखाटलेले दिसते.

रिसबुडांची दुसरी कादंबरी 'विश्वासराव' ही मंजुघोषेच्या वळणांची वाटते. विश्वासराव हा सरदारपुत्र प्रवासानिमित्त उत्तर हिंदुस्तानात गेला असता तेथील राजकारणात सापडतो. तेथे त्याला आलेल्या अडचणी प्रसंगाचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. ''प्रभवमालिनी व कलावती (१८६८)या एक स्वदेशकल्याणेच्छु यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या आहे. 'विचित्रपुरी' (१८७०)ही केशव लक्ष्मण जोरवेकर यांची कादंबरी संमिश्र वळणाची वाटते. प्रवासात अपघात, अपघातातून येणारे पुष्कळसे अद्‌भूतरम्य प्रसंग या कादंबरीत दिसतात. १८७० साली लिहिलेली वामनकृष्ण देशमुख यांची 'सुहास्यवदना' ही कादंबरी, हे तिच्यातील नायिकेचे नाव आहे. चंपकमाला' ही कादंबरी अण्णा जोशी वं विनायक बाबरे यांनी लिहिलेली आहे. या कादंबरीत त्यांनी राजकन्या चंपकमाला अवघी वय–तेरा चौदाची, पण संस्कृत नायिकेच्या सौंदर्याचे चित्रण केलेले दिसते. 'विलासिनी' (१८७१)ही रामचंद्र आबाजी राजे यांची कादंबरी, तर यानंतर जनार्दन शास्त्री यांची 'सुवर्णमालिनी' (१८७४)कादंबरी प्रकाशित झाली. 'चंद्रप्रभाविरहवर्णन — १८७३ हिचे लेखन साळूबाई भ्र. तांबवेकर या महाराष्ट्रीयन स्त्रीने केले आहे. 'प्रेमबंधन' ही कादंबरी नारायण दामोदर जोशी यांनी लिहिली असून लेखकांच्या दोलायमान अवस्थेची, रचनेची घडण दाखविणारी या दश्टीने महत्वाची आहे. याच काळात काही सामाजिक विषयांवरही कादंबरी लेखन झालेले दिसते. एकूणच आतापर्यंत पाहिलेल्या कादंबऱ्या इतिहासावर अद्‌भूतरम्य प्रसंगावर, घटनांवर आधारीत होत्या. समाज, समाजातील समस्या, प्रसंग यांवर काही कादंबरीकारांनी लेखन केलेले दिसते.

सुरुवातीच्या इंग्रजीतील कथा — कादंबऱ्यांचे प्रमुख वळण 'अद्‌भुतरम्य' असले, तरी त्या वळणाच्या निदर्शक 'मुक्तामाला' च्या आधीच वेगळया वळणाची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी बाबा पद्‌मनजींनी इ.स. १८५७ साली प्रसिध्द केली. मराठीतील पहिली स्वतंत्र व सामाजिक कादंबरी म्हणून तिचा उल्लेख केला जातो. या कादंबरीचे लेखक बाबा पद्‌मनजी ख्रिस्ती झाले होते. पण त्यांची हिंदू बायको त्यांच्याकडे येण्यास तयार नव्हती. या सर्व खटल्यांची खर्चाची तरतूद करण्यासाठी बाबांनी ही कादंबरी लिहिलेली दिसते. 'अवलिया' ही विनायक बाळकृष्ण दामले यांची कादंबरी दूर्मिळ म्हणून नोंदली गेल्यामुळे तिची पुरेशी दखल घेतलेली नाही.

या कादंबऱ्या आपल्याला सुरुवातीच्या काळातील दिसतात. पण यानंतर खऱ्या अर्थाने मोठया प्रमाणात कादंबरी लेखन विसाव्या शतकात झालेले दिसते. धर्मसुधारणा, मध्यमवर्गाचा उदय, इहवादी आणि विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, व्यक्तिवाद, शिक्षणप्रसार, लोकशाही राज्यपध्दती अशा विविध गोष्टीचा संबंध कादंबरी या साहित्य प्रकारांच्या अवतरणांशी येतो. यमुनापर्यटन बाजूला काढून ठेवली तर मुक्तामाला, मंजुघोषा या अद्‌भूतरम्य कादंबऱ्यापासून सुरु झालेला मराठी कादंबऱ्याचा प्रवाह हरिभाऊ–केतकरांच्या वास्तववादी कादंबऱ्यामध्ये परिवर्तीत होतो. १९३० नंतर ही प्रवृत्ती क्षीण होऊन फडके — खांडेकरांची रोमँटिक, आदर्शवादी प्रवृत्ती, प्रभावी ठरते. १९५० जवळ येत असताना बा.सी.मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस' (१९४२)च्या रुपाने संज्ञाप्रवाहाचे तंत्र वापरणारी एक आधुनिकवादी संहिता सादर होते. १९५० नंतरच्या



Scanned with CamScanner

कादंबरीचा विचार करतांना 'यमुना पर्यटन' प्रमाणे 'बळी' (१९५०)बाजूला ठेवावी लागते. केतकरांचे वास्तववादाला देणारे स्थान भाऊ पाध्ये – भालचंद्र नेमाडे घेतात. आधुनिक वाद आणि वास्तववाद यांचा प्रभाव दृढमूल होत आहे असे वाटत असतानाच ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक कादंबरीच्या रुपाने वास्तवापासून दूर सरकणाऱ्या कादंबरीचा प्रभाव जाणवू लागतो.

भोवतालच्या जगाकडे असलेला रोख, वर्तमानाला असलेले महत्व, परिवर्तनाच्या वेगवान प्रवाहात सापडलेला समाज आणि व्यक्ती यांच्यातील संबंधाचे चित्रण, वास्तव तपशिलांना कादंबरीच्या संकेत व्यूहात रुपांतरित करण्याचे सामर्थ्य, पारंपारिक चौकटी नाकारुन नव्या आणि असुरक्षित आधारांवर आत्मशोध घेण्याची प्रवृत्ती हे कादंबरीचे खास विशेष आहेत.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या प्रेरणांमधून लेखन करणारे ना.सी.फडके आणि वि.स. खांडेकर हे दोन महत्वाचे कादंबरीकार १९५० नंतरच्या काळातही लेखन करीत यामध्ये ना.सी.फडके यांच्या 'जेहलम–१९५० भरतीची लाट–१९५०, सितारा मंझिल १९५३, शिकार–१९५४' आणि आणखी वीस एक कादंबऱ्या याा कालखंडात प्रकाशित झालेल्या दिसतात. ना.सी. फडके यांच्या कादंबरीची दिशा पु.भा. भावे यांच्या 'अकुलिना १९५१, वर्षाव १९५८' यासारख्या कादंबऱ्यांनी घेतली. स्त्री–पुरुषांचे प्रेमाचे संबंध त्यांच्या कादंबऱ्याच्या केंद्रस्थानी असलेले दिसतात. 'अश्रू १९५३ ययाति १९५९ आणि अमश्तवेल १९६७' या तीनच कादंबऱ्या वि. स. खांडेकरांनी या कालखंडात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, बुध्दिप्रामाण्य या सारख्या प्रबोधनाच्या मूल्यव्यूहातील मूल्यांना असलेले महत्व लक्षात येते. दोन महायुध्दादरम्यानच्या मधल्या काळात 'उल्का' ही कादंबरी प्रकाशित झाली. बा. सी. मर्ढेकरांची रात्रीचा दिवस (१९४२)तांबडी माती (१९४३), पाणी (१९४८)इ. कादंबऱ्या. त्यांनी या कादंबऱ्याच्या माध्यमातून मानवी परिस्थितीवर भाष्य, तसेच भांडवलशाही व्यवस्थेतील माणसांची परिस्थिती याचे चित्रण केले आहे. महायुध्दानंतरच्या कालखंडात पांढरपेशांच्या घरात त्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारे सुरुंग कसे पेरले जात आहे याचे चित्रण 'घर' १९५३ या कादंबरीत वसंत कानेटकर यांनी केले आहे, 'पोरका' (१९५६)ही त्यांची दुसरी कादंबरी आहे.

गंगाधर गाडगीळ यांची 'लिलिचे फुल' (१९५५)ही कादंबरी वर्तमानातील गूढ, रहस्यमय थरारक घटनांच्या साह्याने एक नाटयात्म वर्तमानकाळ गाडगीळांनी या कादंबरीत मांडला आहे. खेड्यांचा हा कालावकाश त्यांच्या सर्व वैशिष्टयांसह आणि मर्यादासह व्यंकटेश मांडगूळकरांच्या 'बनगरवाडी' (१९५५)या कादंबरीतून प्रकट झालेला दिसतो. शरच्चंद्र मुक्तिबोध यांची पहिली कादंबरी १९५४ मध्ये क्षिप्रा प्रकाशित झाली. सरहद्द १९६१, जन हे वोळतु जेथे, ही कादंबरी १९६९ मध्ये प्रकाशित झाली, मुक्तिबोध मार्क्सवादी असले तरी ते मार्क्सवादाची परिभाषा ते वापरत नाहीत. स्त्री विषयक प्रश्नांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न स्वातंत्र्य पूर्वकाळात विभावरी शिरुरकर, गीता साने या लेखिकांनी केला. 'बळी १९५०, जाई १९५३, शबरी १९६६' या कादंबऱ्यातून स्त्रीच्या कोंडमाऱ्याला वाचा फोडणारे लेखन विभावरी शिरुरकर यांनी केले आहे. आण्णाभाऊ साठे हे मध्यमवर्गीय जाणिवेच्या कक्षेपलीकडे राहणारा कादंबरीकार त्यांच्या वारणेच्या खोऱ्यात १९५१, चित्रा १९५२, फकिरा १९५९ मध्ये तर पुढच्या काळात १९६९ पर्यंत एकूण बत्तीस कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहे.

१९६० नंतर प्रकाशित झालेल्या कादंबऱ्या या नवकादंबरी म्हणून ओळखल्या जातात. भाऊ पाध्ये यांच्या ''डोबाऱ्याचा खेळ १९६०, वैतागवाडी, वासुनाका, बॅ.अनिरुध्द धोपेश्वरकर, अग्रेसर, राडा, वणवा, सर्जिकल या कादंबऱ्या त्यांनी प्रकाशित केल्या. मनोहर शहाणे यांच्या धाकटेआकाश, झाकोळ, देवाचा शब्द, पुत्र इ. कादंबऱ्या तर चि.त्र्यं. खानोलकर यांच्या रात्र काळी घागर काळी, अजगर, कोंडुरा, त्रिशंकू या कादंबऱ्यांतून त्यांनी जाणिवेचा अविष्कार केला. १९७५ मध्ये 'काळा सुर्य आणि हॅट घालणारी बाई' या कादंबरीचे लेखन केले. भालचंद्र नेमाडे यांची कोसला ही कादंबरी १९६३ मध्ये प्रकाशित झाली. जीवनाला अर्थ नाही, व्यवस्था नाही. ते भंकस आहे यातुन कोसला ही कादंबरी जन्मली.

एका ध्येयाला पायदळी तुडवून दुसऱ्या



Scanned with CamScanner

ध्येयाला गाठण्याचा प्रयत्न खांडेकरांच्या कादंबरीत दिसतो. युध्दाला सामोरे जातो, पण त्याच्या व्यक्तीगत पातळीवरच्या जीवनाला तिलाजंणी देणारे लेखन खांडेकरांचे दिसते. या काळात कथेपेक्षा कादंबरीचे प्रमाण जास्त होते. मला जे सांगायचे मांडायचे ते लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून मांडलेले दिसते. एकूणच प्रत्येक विषयाला अनुसरुन लेखकांनी कादंबरी लेखन केलेले दिसते. १८१८ ते १९२० या काळात कादंबऱ्यांचे प्रमाण कमी असले तरी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वास्तववादी कादंबऱ्यांच्या माध्यमातून नवकादंबरीकार पुढे आलेले दिसतात. या काळातील समस्या, जातीय प्रश्न, गावगाडा, भटकंती, स्त्रीशोषण, राजकीय, आर्थिक प्रश्न कादंबरीच्या माध्यमातून समोर आलेले दिसतात.

## संदर्भ ग्रंथसुची

१ मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे पहिली आवृत्ती १९६५

२. अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकीत्सक आढावा, प्रदक्षिणा खंड पहिला. कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती १९४१, पुर्नमुद्रण २००७.

❑❑❑

26

# आधुनिक मराठी साहित्यातील प्रवाह : महानगरीय कांदबरी

प्रा. डॉ. प्रवीण ताटे–देशमुख
मराठी विभाग,
मु. सा. काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर,
ता. बारामती, जि. पुणे

## प्रस्तावनाः—

इ. स. १९६० नंतर एकूणच मराठी साहित्याला अनेक नवे धुमारे फुटले. वेगळे भान, वेगळया संवेदना, वेगळया जाणिवा व्यक्ती करणारी कांदबरी लिहिली जाऊ लागली. त्यात महानगरीय संवेदना व्यक्त करणाऱ्या कांदबरीचा प्रवाह ठळकपणे दिसतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या विकासाला गती देण्याचा भाग म्हणून औद्योगिकीकरणाची सुरूवात झाली. औद्योगिकीकरणामुळे महानगरांचा झपाटयाने विस्तार झाला. हमखासपणे रोजगाराची संधी उपलब्ध होत असल्यामुळे खेडयातील माणंसाचे, परराज्यातील माणसांचे शहरात स्थलांतर झाले. विविध प्रदेशातील माणसे येताना भाषा, संस्कशती, संस्कार, चालीरिती घेऊन शहरात येऊ लागली. आणि याच कारणाने महानगरात 'व्यमिश्र' सांस्कृतिक विश्व आकाराला आले. त्याचबरोबर शहरात प्रमाणापेक्षा जास्त गर्दी वाढल्यामुळे नागरी सुविधांवर परिणाम झाला. निवासाच्या गैरसोयीमुळे झोपडपटयांची बेफाम वाढ झाली. शहंरामध्ये माणंसाचे राहणीमानानुसार अनेक स्तर निर्माण झाले. उच्चभ्रू वर्ग, मध्यमवर्ग, कनिष्ठ वर्ग असे स्तर तयार झाले.या स्तरात गुरफटलेल्या व्यक्तींची स्तर किंवा वर्ग बदलण्यासाठी धडपड सुरू आहे. श्रमिक, मजूर, कामगार, व्यापारी, नोकरदार, भांडवलदार यांसारख्या वर्गाचे जीवन महानगरातल्या अस्तित्वावर उभे राहिले आणि याच वर्गातून बहुविध संस्कृती आकाराला आली,



Scanned with CamScanner



Indexed

IMPACT 6.021 iijif FACTOR

Cosmos
IMPACT FACTOR
5.234

Published By

**H**arshwardhan **P**ublication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
**(Maharashtra) Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**

**ISSN-2319 9318**

Scanned with CamScanner